# Details on Website

# वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

## मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेल्या उप सचिव यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

**विभागाची आवश्यकता :**

खुल्या बाजाराव्यतिरिक्त वित्तीय संस्थांकडून घ्यावयाच्या कर्जाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाशी जसे की जागतिक बँक, एआआयबी, अेडीबी तसेच बाहय सहाय्यीत प्रकल्पाबाबत कामकाजाचे समन्वय, मंत्रालयीन विभागामार्फत उभारल्या जाणाऱ्या कर्जासंबंधी धोरणात्मक बाबी हाताळणे, केंद्र शासनाकडून विशेष भांडवली खर्चासाठी उपलब्ध होणाऱ्या कर्जाचे नियमन करणे इ. कामाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त उप सचिव यांची १ वर्षासाठी वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती प्रथमत: एक वर्षाकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १० जून,२०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे.

३) वित्त विभागातील अर्थबळ, वित्त आयोग, साधनसंपत्ती, अर्थोपाय तसेच ऋण व हमी या कार्यासनातील उपरोक्तप्रमाणे कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.

४) उमेदवार मंत्रालयीन सेवेतून निवृत्त झालेला असावा.

५) उमेदवाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या मंत्रालीयन सेवेतून निवृत्त झालेल्या इच्छुक सेवानिवृत्त उप सचिव यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने त्यांचा अर्ज सदर पदाकरिता वेबसाईट वरील जाहीरात पाहून adm1.fd@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर दिनांक १०.१०.२०२५ पर्यंत सादर करावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२८२६८११ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त उप सचिव यांना वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) करार पध्दतीच्या नियुक्तीवरील कालावधीत सेवानिवृत्त उप सचिव हे संबंधित सह सचिव/ उप सचिव यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई १५२५/प्र.क.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

--x--

# अर्जाचा नमुना

## सेवानिवृत्त उप सचिव यांची करार पध्दतीने नियुक्तीकरण्याकरिता अर्ज

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |
|---|

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-........................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-........................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-........................................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-........................................................................

५) जन्म दिनांक व सध्याचे वय :-........................................................................

६) मूळ निवृत्तिवेतन :-........................................................................
(PPO ची प्रत सोबत जोडावी)

७) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/नाही

८) अनुभव (थोडक्यात) :-........................................................................

९) वित्त विभागाच्या संकेतस्थळावर दि. रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीच्या अनुषंगाने या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून जाहीरातीतील /सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी